नियमित दिवाणी दावा क्र. २०/२०१४
सुनंदा वि. सुरेंद्र
(MHSI080001322014)

**<u>निशाणी क्र. १८४ वरील आदेश</u>**

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.२६, २८ व २९ यांनी वृक्षअधिकारी कणकवली यांना कागदपत्रे हजर करण्याबाबत समन्स निर्गमित होणेकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.२६, २८ व २९ यांनी असे कथन केले आहे की, त्यांनी रमेश रावराणे यांनी झाडतोडीच्या संदर्भातील वृक्षअधिकारी कणकवली यांच्याकडे काही कागदपत्रे दाखल केली आहेत. सदरची मुळ कागदपत्रे वृक्षअधिकारी कणकवली यांच्या कार्यालयात आहेत. प्रतिवादींना पुरावा द्यावयाचा असल्यामुळे व सदरची कागदपत्रे वाद कथनांशी संबंधित असल्यामुळे सदरची कागदपत्रे अभिलेखावर दाखल होणे आवश्यक आहे. त्यांनी पुढे अशी विनंती केली आहे की, दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश १६ नियम १ प्रमाणे वृक्षअधिकारी कणकवली यांना सदरची कागदपत्रे दाखल करण्याबाबत समन्स निर्गमित करण्यात यावेत.

२. वादी याने आपले म्हणणे दाखल करुन प्रस्तूत अर्जास प्रखर विरोध दर्शविला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादींनी अर्जात कथन केलेली कागदपत्रे बोलवण्याची कोणतीही आवश्यकता नाही.

३. अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचे युक्तिवाद ऐकले. प्रतिवादी क्र.२६ यांनी नि.क्र.९३ प्रमाणे दाखल केलेली कैफियत त्यांचे वारस प्रतिवादी क्र.२६–१ ते २६–३ यांनी मान्य केलेली आहे. कैफियत नि.क्र.९३ मध्ये असे कथन करण्यात आले आहे की, प्रतिवादींनी वनअधिकारी यांची परवानगी घेऊन दावा मिळकतीतील झाडे

तोडलेली आहेत. सदरचा परवानगीचा संदर्भ वृक्षतोड परवानगी नंबर रेंज वृक्षतोड प्रकरण क्रमांक २७०/२०१३–२०१४ कणकवली दि.१८/१०/२०१३ असा आहे. वादीतर्फे सा.क्र.१ सुरेंद्र यांचे उलटतपासात सुध्दा सदर वृक्षतोड परवानगी बाबत प्रतिवादी क्र. २६–१ ते २६–३ व प्रतिवादी क्र.२८ व २९ यांचे मार्फत प्रश्न विचारण्यात आलेले आहेत. त्यामुळे, माझ्या मते प्रतिवादींनी प्रस्तूत अर्जात नमुद केलेली प्रस्तावित कागदपत्रे प्रस्तूत प्रकरणाशी निगडित आहेत. दोन्ही पक्षांना त्यांच्या कथनानुसार पुरावा सादर करण्याची संधी मिळणे समान न्यायतत्वाच्या अनुषंगाने आवश्यक आहे.

४. वरील कारणमिमांसेचा सारांश असा आहे की, अर्ज नि.क्र.१८४ मंजूर होण्यास पात्र आहे. करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| **आदेश** | |
|---|---|
| १. | अर्ज निशाणी क्र. १८४ मंजुर करण्यात येतो. |
| २. | वृक्षअधिकारी कणकवली यांना रमेश विष्णू रावराणे, रा.आचिर्णे, ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग यांनी वृक्षतोड परवानगी नंबर रेंज वृक्षतोड प्रकरण क्रमांक २७०/२०१३–२०१४ कणकवली दि.१८/१०/२०१३ या प्रकरणातील दाखल केलेला अर्ज व त्या संबंधातील संपूर्ण मुळ कागदपत्रे अभिलेखावर दाखल करणेबाबत समन्स निर्गमित करण्यात यावेत. |
| ३. | अर्जाचा खर्च मुळ दाव्याचे निकालावर. |

सही/–
(टी. एच. शेख)
न्यायाधिकारी, ग्रामन्यायालय,
वैभववाडी

दिनांकः १३/१२/२०२३